# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/10/2023 (मंगळवार) सकाळ


### लोखंडी एंगल चोरी

**पो.स्टे. खापा** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा कोच्छी येथे दिनांक २२/१०/२०२३ चे १७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे — रेवाकांत काशिराव भोंगळे, वय ४७ वर्ष, रा. प्लॉट नं ४६ कोहळे ले आउट खडगाव रोड वाडी जि. नागपुर हे एस. एस. फॅब्रीकेशन ॲन्ड मॅनुफॅक्चर कंपनी मध्ये मॅनेजर म्हणुन काम करतात. दिनांक २२/१०/२०२३ रोजी फिर्यादी आपले घरी हजर असतांना सकाळी १०/०० वा. सुमारास प्रोजेक्ट मध्ये काम करणारे थामदेव फुंडे यांनी फोन करुन सांगीतले की मौजा कोच्छी गावात राहणारे गौतम भंडारे आणि नितेश कोचे यांनी सायंकाळी ५/३० वा. सुमारास कोच्छी बॅरेजचे फॅब्रीकेशनचे काम सुरु असलेल्या ठिकाणावर येवुन त्या ठिकाणी फॅब्रीकेशनचे कामा करीता ठेवलेले ३५ किलो वजनाचे लोखंडी एंगल किंमती २१००/— रु. चा मुद्देमाल चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपींविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक संतोष परतेकी पोस्टे खापा मो. नं. ९११२११७५४७ हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. कळमेश्वर** :— दिनांक १९/१०/२०२३ चे १९.३० वा. दरम्यान पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत फिर्यादीची मुलगी वय १४ वर्ष ही तिचे आजीला मंदिरात जाते, असे सांगुन घरुन निघुन गेली. यानंतर फिर्यादी त्याच दिवशी हे २०/३० वा. दरम्यान घरी गेले असता मुलगी ही घरी दिसली नाही. जास्त वेळ होऊन सुध्दा घरी न आल्याने फिर्यादी व त्यांचे परीवाराने मुलीचा शोध घेतला परंतु ती मिळुन आली नाही. फिर्यादीची मुलगी ही यापुर्वीही घरुन निघुन गेली होती. त्यावेळी कळमेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्याचे ०३ तासानंतर ती परत आली होती. यावेळी सुध्दा ती घरी परत येईल म्हणुन फिर्यादी नातेवाईकांकडे जाऊन शोध घेत होते. फिर्यादीने मुलीच्या मैत्रीणीला विचारले असता, फिर्यादीची मुलगी ही हुडको कॉलोनी कळमेश्वर येथे राहणाऱ्या रोहण कमलेश सींग याचेसह नेहमी बोलचाल करित असते त्यानेच फिर्यादीच्या मुलीला पळवुन नेले असावे असे तीने सांगितले. करिता फिर्यादीच्या मुलीचा अल्पवयाचा फायदा घेऊन आरोपी रोहण कमलेश सींग याने फुस लावुन पळवुन नेले असावे असा फिर्यादीला संशय आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार मनोज गाढवे मो. नं. ८८०५४०५१०७ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर